# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### साजगाव-अडोशी (ता.खोपोली, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील जड वाहन वाहतुकीमुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(१) ८०३३ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साजगाव-अडोशी (ता.खोपोली, जि.रायगड) या औद्योगिक वसाहतीमधील जड वाहन वाहतुकीमुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०५-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) साजगाव-अडोशी (रा.मा.७६) हा रस्ता औद्योगिक वसाहतीतून जात असून अति अवजड वाहनांमुळे व अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी खराब झालेला रस्त्याचा भाग डांबरीकरणाने दुरुस्त करुन घेण्यात आला आहे. सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगवडे (ता.मावळ, जि.पुणे) येथे पवना नदीत भराव टाकल्याबाबत

**(२) २४२५० (१२-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालुक्यातील (जि.पुणे) गहुंजे सांगवडे दरम्यान पुणे-मुंबई द्रुतगती मार्गालगत सुमारे शंभर एकर जागेत मोठ्या गृहप्रकल्पाचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृहप्रकल्पासाठी स्वतंत्र पाणी पुरवठा प्रकल्प उभारण्यात येत असुन, त्यासाठी पवना नदीपात्रात जॅकवेल उभारण्याचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नदीपात्रात सुमारे ८० टक्क्यांपेक्षा अधिक मातीचा भराव टाकण्यात आला असल्यामुळे मुख्य प्रवाह अडला आहे व त्यामुळे पाण्याला दुर्गंधी सुटली असुन, पाणी प्रदुषित होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एका गृहप्रकल्पासाठी जॅकवेलचे काम व सांगवडे येथे पवना नदीत भराव यामुळे दुषित होणारे पवना नदीचे पाणी, ग्रामस्थांच्या या मागणी बाबत शासनाची काय भुमिका आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) मंडल अधिकारी, तळेगाव दाभाडे यांच्यामार्फत प्रत्यक्ष पाहणी केली असता पवना नदीपात्रात सुमारे ८० टक्क्यांपेक्षा अधिक मातीचा भराव टाकण्यात आल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे नदीच्या मुख्य प्रवाहास कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे पाण्यास दुर्गंधी सुटण्याचा व पाणी प्रदुषित होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्ह्यातील मौजे रुडखेडा-तिघ्रा-विवरा-दसरखेड-म्हैसवाडी या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३) २५४२३ (१४-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे रुडखेडा-तिघ्रा-विवरा-दसरखेड-म्हैसवाडी हा रस्ता नादुरुस्त झाला असून या रस्त्यावरुन अवागमन करतांना वाहनधारक व सामान्य नागरीकांची गैरसोय होत आहे, या रस्त्यावर ५/० ते ६/० या अंतरामध्ये उष्णमिश्रीत डांबरीकरण व मोरीचे बांधकाम करणे आवश्यक असल्याची बाब माहे जून, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून यासाठी ४५ लक्ष रुपये निधीची आवश्कता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे व मोरीचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्ता व मोरीचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सा.बा. विभाग, खामगांव याना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०१-२०१६) :**(१) होय.
तथापि, रस्त्यावरून वाहनांची वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(२) होय. रस्त्याची सुधारणा व एका स्लॅब ड्रेन्चे बांधकाम करणे आवश्यक आहे.
(३) होय.
(४) प्रस्तुत आवश्यक कामे मंजूरी, निधी निकष व प्राधान्याक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अचलपूर (जि.अमरावती) तहसील कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी निधी मिळणेबाबत**

**(४) २८८९४ (०८-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर मतदार संघातील तहसील कार्यालय इमारतीचे दुरुस्ती तथा नुतनीकरण कामा करिता रुपये १ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपूर यांनी दिनांक ७ सप्टेबंर, २०१५ रोजी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) तहसीलदार, अचलपूर या कार्यालयाचे नुतनीकरण करण्यासाठीच्या कामाची रु.९९.०७ लक्ष किंमतीचे प्राथमिक अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी प्राप्त झाले असून सदर प्रस्ताव शासन स्तरावर तपासण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या कामगारांना घरकुल बांधणीसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याबाबत**

**(५) ३५२७२ (२३-१२-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या कामगारांना घरकुल बांधणीसाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावेत असे आदेश शासनाने माहे जुलै, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे आदेश देवूनही सदरचे प्रमाणपत्र कामगारांना अदयापर्यंत देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती महामंडळाच्या कामगारांना घरकुलासाठी नाहरकत प्रमाणपत्र न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथील सर्व्हेनंबर ३३/१ ब, / १ या मिळकत धारकाने जास्त क्षेत्राची विक्री केल्याबाबत**

**(६) ३५७७५ (०८-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील सर्व्हे नं.३३/१ ब, /१ वारजे गांव, दत्तनगर या मिळकत धारकाने त्याच्या नावे ५४.७१ एवढी जमीन असतांना त्याच्या क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राची विक्री केल्याचे माहे ओक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी, मंडल अधिकारी, तहसीलदार व उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी क्षेत्राचा मेळ घातला असता त्यांचे निकालात सदर मिळकत धारकाने जास्त क्षेत्र विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने मूळ भूधारकाचे गा.न.नं.७/१२ वरील नाव कमी करण्याचे आदेश तहसिलदार, हवेली यांनी दि.११/०२/२०१३ रोजी पारीत केले. सदर आदेशाविरुध्द उपविभागीय अधिकारी, हवेली यांचेकडे अपील दाखल केले असता उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी दि.३०/१२/२०१४ च्या आदेशान्वये तहसिलदार, हवेली यांचे आदेश कायम केले आहेत. सदर

आदेशाविरुध्द अपर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दाखल अपीलावर दि.०३/०५/२०१६ च्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी यांचे आदेश कायम करण्यात आले आहेत. सदर आदेशाविरुध्द अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे पुनरीक्षण अर्ज दाखल आहे. प्रस्तुत प्रकरण अर्ध-न्यायिक स्वरुपाचे असल्याने नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**येरवडा (जि.पुणे) येथील शासकीय जमीन मुकुंद भवन ट्रस्टला दिल्याबाबत**

**(७) ३६०६३ (२३-१२-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील शासकीय जमीन मुकुंद भवन ट्रस्ट नामक संस्थेला देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मुकुंद भवन नामक ट्रस्टला एकूण किती जमीन कोणत्या अटीनुसार दिली आहे,

(३) असल्यास, या जमीनीचे हस्तांतर व्यवहार नियमानुसार झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१२-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) मुकुंद भवन ट्रस्टला एकूण ३२.२९ हे.जमीन देण्यात आलेली आहे.

शासन व मुकुंद भवन ट्रस्ट यांचे दरम्यान दि.१८/१२/१९८९ रोजी सिव्हील सूट क्र.१६२२/१९८८ मध्ये झालेल्या समझोता करारानुसार सदर जमिन मुकुंद भवन ट्रस्ट येरवडा, पुणे यांना शासन ज्ञापन महसूल व वन विभाग दि.०३/०४/१९९० अन्वये देण्यात आलेली आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यातील वाळू गटांच्या लिलाव प्रक्रियेसाठी प्रस्ताव पाठविल्याबाबत**

**(८) ३७७४९ (२३-१२-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागाने जळगाव जिल्ह्यातील वाळू गटांच्या लिलाव प्रक्रियेसाठी प्रस्ताव नुकतेच पर्यावरण विभागाकडे पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लिलावास २६ ग्रामपंचायतीनी दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभूमीवर या वाळू लिलावास विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ग्रामपंचायतीच्या विरोधानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१६) :**(१), (२) व (३) जिल्हाधिकारी जळगांव यांनी दिनांक १५/१०/२०१५ व दिनांक २९/१०/२०१५ च्या पत्रान्वये, सन २०१५-१६ या वर्षाच्या लिलावासाठी जळगांव जिल्ह्यातील ४४ वाळूगटांचे प्रस्ताव पर्यावरण अनुमतीसाठी राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समितीकडे सादर केले होते. राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समितीने दिनांक ३०/१०/२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये सदर वाळूगटांना पर्यावरण अनुमती देण्याची शिफारस केली होती. त्यानुसार राज्यस्तरीय पर्यावरण आघात निर्धारण समितीने दिनांक १६/०१/२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये पर्यावरण अनूमती दिली.

२८ ग्रामपंचायतींनी वाळू लिलावास विरोध दर्शविला होता. त्यामुळे शासन निर्णय क्र.गौखनि-१०/०५१२/प्र.क्र.३००/ख, दिनांक १२/३/२०१३ मधील तरतूदीनुसार उपविभागीय अधिकारी यांनी विशेष ग्रामसभा घेऊन संबंधित ग्रामस्थांचे आक्षेप/हरकती/कारणे विचारात घेऊन गुणवत्तेवर सदर वाळूगटांचे लिलाव करण्याबाबत शिफारशी केलेल्या होत्या.
(४) प्रश्न उद्भतव नाही.

---

**मौजे उर्णोली (ता.पेण, जि.रायगड) येथील खारेपाटशेतीची नोंद वहिवाटदार शेतकऱ्यांच्या नावे ७/१२ वर करण्याबाबत**

**(९) ४०१७१ (२०-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे उर्णोली, पो.सोनखार (ता.पेण, जि.रायगड) येथील समुद्रकिनाऱ्यालगतची खारेपाटशेतीची नोंद वहिवाटदार शेतकऱ्यांच्या ७/१२ वर करण्याबाबत या शेतकऱ्यांनी वारंवार शासनाकडे विनंती अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०१-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) प्रस्तूत प्रकरणी तहसिलदार, पेण यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. मौजे उर्णोली पातळगंगा खाडी किनारी स.नं.३५,३६,३७,३८, ४१ व ४३ या जमिनीच्या उत्तेरस परिघ क्षेत्र (गाळाने तयार झालेले क्षेत्र) असून या क्षेत्राला स.नं. नसल्यामुळे सदर जमिनीची मोजणी करण्यासाठी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रायगड-अलिबाग यांना निर्देश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३२,३३,६५ व ६६ तसेच महाराष्ट्र

जमिन महसूल (मळईची जमीन व धोत जमीन) नियम १९६७ मधील नियम ४ नुसार, गाळाने तयार झालेल्या क्षेत्रालगतच्या भोगवटाधारकास विहित शुल्क आकारुन सदर गाळाची जमीन कसण्यास देता येते. प्रस्तुत प्रकरणात जमिनीचे मोजणीनंतर जमिनीवर ज्याची वहिवाट आहे ते सदर क्षेत्रालगतचे भोगवटादार आहेत किंवा कसे हे स्पष्ट होईल. अन्यथा ग्रामस्थांचे उक्त मळई जमिनीवर अतिक्रमण असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५०, ५१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासींच्या जमिनी बिगर आदीवासींना विक्री करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१०) ४०३२६ (२०-०४-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-ठाणे, औरंगाबाद - दिघी आणि नाशिक - सिन्नर - इगतपुरी औद्योगिक पट्टयातील आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींसाठी विक्रीकरीता खुल्या करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी समाजाच्या आमदारांनी पत्रकार परिषद घेऊन शासनाच्या उक्त निर्णयास विरोध दर्शवून मा.राज्यपाल महोदयांची भेट घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ नुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासींची फसवणूक टाळण्यासाठी व त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१) नाही. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम-३६ अ अन्वये आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना बिनशेती प्रयोजनासाठी शासनाच्या पूर्व परवानगीने हस्तांतरणास परवानगी देण्याची तरतूद आहे. उक्त कलमान्वये तसेच, महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करणे अधिनियम, १९७४ आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम-३६ आणि ३६ अ मधील तरतूदीनुसार नियमबाह्यरित्या हस्तांतरीत झालेल्या आदिवासींच्या जमिनी परत करण्याची तरतूद आहे.

या तरतूदीच्या अनुषंगाने पूर्वी वेळोवेळी प्रकरणपरत्वे गुणवत्तेवर निर्णय घेऊन आदिवासी जमीनधारकांच्या जमिनी बिगर आदिवासींना हस्तांतरणास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी श्री.मधुकरराव पिचड, कार्यकारी अध्यक्ष, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद यांनी ४५ सदस्यांसह आदिवासींच्या विकास संदर्भातील विविध मुद्दांबाबत मा.राज्यपाल महोद्यांची भेट घेवून निवेदन सादर केले होते.

(३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार समितीच्या ४८ व्या बैठकीमध्ये आदिवासींच्या जमिनीचे बिगर आदिवासींना होणारे हस्तांतरण रोखण्यासाठी इतर राज्यात असलेल्या कायद्याची तपासणी करुन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये योग्य तो बदल करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन समितीच्या अहवालावर निर्णय होईपर्यंत नवीन हस्तांतराचा प्रस्ताव नोंदवू नये या स्वरुपाचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुषंगाने आदिवासी विकास विभागाने शासन निर्णय क्र.जजाप-२०१४/प्र.क्र.७७/का.१४, दिनांक ११.६.२०१४ अन्वये समिती नेमली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल आदिवासी विकास विभागाकडे सादर केला आहे.

दरम्यानच्या कालावधीमध्ये आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरणास परवानगी देण्याबाबत तसेच परवानगी न देण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच इतरांची विविध निवेदने शासनाकडे प्राप्त झालेली आहेत.

सदर समितीने सादर केलेल्या अहवालाची छाननी करण्यात येत असून त्यामधील शिफारशीच्या अनुषंगाने कायद्यात बदल करण्याचा किंवा इतर कोणताही निर्णय शासनस्तरावर अद्याप घेण्यात आलेला नाही.

---

**जिओ एक्सलन्स संस्थेने पुणे शहराच्या आजुबाजूच्या पंचवीस**
**टक्के टेकड्या जमिनीदोस्त केल्याबाबत**

**(११) ४०४२७ (२०-०४-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिओ एक्सलन्स संस्थेने भौगोलिक सर्वेक्षणाचा अभ्यास करत असताना पुणे शहराच्या आजुबाजूच्या टेकड्या पैकी पंचवीस टक्के टेकड्या जमिनीदोस्त केल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारजे बाणेर पाषाण कात्रज परिसरात असणाऱ्यां छोट्या मोठ्या टेकड्या फोडून भूभागाला समांतर केल्याचे व गेल्या पंचवीस वर्षापूर्वी पासूनचे असणारे जलस्त्रोत बुजविण्यात व नष्ट करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०२-२०१७) :**(१) व (२) जिओ एक्सलन्स संस्थेने भौगोलिक सर्वेक्षणाचा अभ्यास करुन, शासनास कोणताही अहवाल सादर केलेला नाही, तथापि, प्रश्नाधिन भागात टेकड्या फोडून भूभागाला समांतर केल्याचे व जलस्त्रोत नष्ट केल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळगंगा धरण प्रकल्पग्रंस्तांना पुर्नवसनासाठी दिलेली रक्कम परत बँकेत जमा करण्यासाठी प्रकल्पग्रस्तांना नोटीस पाठविण्याबाबत**

**(१२) ४०६५३ (०५-०५-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील, बाळगंगा धरणग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याच्या प्रक्रियेत पुनर्वसनाची देण्यात आलेली ५९ लाख रुपयाची रक्कम आयएफएससीद्वारे थेट बँक खात्यात जमा करण्याची रायगड जिल्हा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास एका आदिवासी शेतकऱ्यास नोटीस बजावली, हे खरे आहे काय,

(२) तसेच धरण प्रकल्पग्रस्त एका आदिवासी कुंटुंबास उपजिल्हाधिकारी, रायगड (भुसंपादन) यांच्याकडुन दिनांक २६ मे, २०१५ रोजीच्या अधिसुचनेनुसार जास्तीच्या रकमेचे मुल्यांकन करण्यात आले होते तसेच भुसंपादन अधिकाऱ्यांचा चुकीमुळे जास्तीचे मुल्यांकन झाल्याने शासनाच्या तिजोरीवर अधिकचा भुर्दंड बसलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेष भूसंपादन अधिकारी, रायगड यांच्याकडून प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेले नुकसान भरपाईचे पैसे परत करण्याच्या नोटीसीमुळे प्रकल्पग्रस्त त्रस्त झाल्याने त्यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे याप्रकरणाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी कली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-१२-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

बाळगंगा नदी धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसित गावठाणासाठी संपादित क्षेत्राचे अंतिम निवाडे जाहीर करताना सदर क्षेत्र हे ग्रामीण क्षेत्र गृहीत धरुन गुणक २ ने निवाडे जाहीर केले होते. परतु बाळगंगा नदी धरण प्रकल्पातील संपादित गाव रायगड जिल्हा प्रादेशिक योजनेत अंतर्भूत असल्याने गुणक २.०० ऐवजी गुणक १.५० ने मूल्यांकन करण्याबाबत सहायक संचालक, नगररचना रायगड-अलिबाग यांनी कळविले आहे. भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम १३ क प्रमाणे सहा महिन्यांच्या आत दुरुस्त निवाडा करण्याची तरतूद असून त्याप्रमाणे संबधित खातेदारांना पत्रान्वये सूचित करुन त्यांची सुनावणी घेऊन दुरुस्त निवाडे घोषित करण्यात आले आहेत. तसेच कलम १३ क च्या तरतूदीप्रमाणे अतिरिक्त ठरलेली रक्कम खातेदारांना पत्रान्वये व संबंधित बँकांना पत्र देऊन आरटीजीएसमार्फत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रायगड (०) अलिबाग या कार्यालयाच्या डी.डी.ओ. खाती जमा करुन नंतर कार्यालयाच्या स्वीय प्रपंजी खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

(३) अशा प्रकारचे निवेदन जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलुंड (मुंबई) येथील सर्वे नं २४४/१ अ ,२४५/१ब २५१/१ब व २५२-२ हि आदीवासींची जमिन बिगर आदीवासींनी बेकायदेशीरपणे खरेदी केल्याबाबत**

**(१३) ४१७५० (२०-०४-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (मुंबई) तलाठी सजा येथील सर्वे नं २४४/१ अ ,२४५/१ब २५१/१ब व २५२-२ हि जमीन मूळ आदिवासी अर्जुन हाल्या वारली,लहानू हाल्या वारली व इतर यांची असताना ती सन २०१२ मध्ये बिगर आदिवासींनी बेकायदेशीरपणे खरेदी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने सदरची जमीन मूळ आदिवासी मालकाच्या नावावरून बिगर आदिवासी असणाऱ्या व्यक्तीच्या नावे करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही. प्रश्नांकित जमिनीचे अधिकार अभिलेख पाहता, सदर जमिनी केव्हाही आदिवासींच्या नावे असल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहिल्या को ऑपरेटीव्ह हौंसिग सोसायटी येरवडा (ता.जि.पुणे) या संस्थेस निवासी प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेल्या जमिनीचा गैरवापर करण्यात आल्याबाबत**

**(१४) ४२२८५ (२०-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (ता.जि.पुणे) येथील भूमापन गट क्रमांक २३/२३५ अ-१ येथील अहिल्या को ऑपरेटीव्ह हौंसिग सोसायटी या संस्थेस निवासी प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेल्या शासकीय जमिनीचा गैरवापर करण्यात आल्याबाबतची चौकशी करण्यासाठी संस्थेच्या सभासंदानी मा.महसूल मंत्री यांना दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१२-२०१६) :**(१) होय.

(२), (३) व (४) सदर शर्तभंग प्रकरणी संबंधितांकडून सदनिकेचा ताबा घेऊन शासनजमा करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी पारीत केलेल्या आदेशाविरुध्द एक सदनिकाधारक श्री.दुर्गाराम चौधरी यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे अपील दाखल केले आहे. तसेच अन्य सदनिकाधारक श्रीमती आनसी उर्फ राधा दिपराम चौधरी यांनी जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर येथे दिवाणी दावा दाखल केलेला असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

---

**अप्पर जिल्हाधिकारी मालेगांव (जि.नाशिक) यांनी तक्रारकर्त्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यासाठी तहसीलदार, नांदगाव यांच्यावर दबाव टाकल्याबाबत**

**(१५) ४३१०६ (१६-०५-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील मालेगांवच्या अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी ३५ लाखाची लाच मागितल्या प्रकरणी त्यांना अटक केली असून जामिनावर सुटताच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करणाऱ्या जमीन मालकाविरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यासाठी त्यांनी नांदगाव तहसिलदारावर दबाव टाकण्यास सुरुवात केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१७) :**(१) व (२) श्री.रामचंद्र पवार, तत्का.अप्पर जिल्हाधिकारी, मालेगाव, (सध्या सेवानिवृत्त) यांनी तहसीलदार नांदगाव यांच्याकडे अशा आशयाचे पत्र दिले होते. श्री.पवार यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम २७ च्या पोटनियम (२) (ब) (एक) मधील तरतुदीनुसार शासन ज्ञापन दिनांक २०.९.२०१६ अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने दीर्घ कराराच्या जमिनी दंड भरुन मालकी हक्काने देण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(१६) ४७१३३ (२०-०४-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दीर्घ कराराच्या जमिनी दंड भरुन मालकी हक्काने देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून दौंड येथील सत्ता प्रकार 'ब' च्या जमिनी संबंबिधताना मालकी हक्काने देण्याचा निर्णय सुद्धा माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने, दौंड येथील सत्ता प्रकार 'ब' च्या जमिनी मालकी हक्काने देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१२-२०१६) :**(१), (२) व (३) यासंदर्भात सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१७ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्यात आली असून विवक्षित शासनाच्या जमिनीच्या भोगवट्यांचे रुपांतरण करण्याबाबत कलम २९ अ समाविष्ट करण्यात आले आहे. सदर अधिनियम शासन राजपत्रामध्ये दि.२९/०४/२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

तसेच प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनींचा धारणाधिकार रुपांतरीत करण्याकामी सखोल अभ्यास करुन शासनास उचित शिफारशी करण्याकरीता दि.२३/०३/२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संपूर्ण राज्यात शेतातील वृक्ष सातबाऱ्यात नोंदणीकरीता तलाठी व मंडल अधिकारी यांना अधिकार दिले असल्याबाबत

**(१७) ४८०७३ (२०-०४-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संपूर्ण महाराष्ट्रात शेतातील वृक्ष सातबाऱ्यात नोंदणीकरीता तलाठी व मंडल अधिकारी यांना अधिकार दिले असून गडचिरोली जिल्हयात वृक्षाची नोंद जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रक्रियेला १ ते २ वर्षाचा काळ लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयापासून शेतकऱ्यांचे गाव ५०, १५०, २०० कि.मी. अंतरावर असल्याने सदर व क्षेत्र नक्षलग्रस्त असल्यामुळे अनेक ठिकाणी ५ वाजेपर्यंत वाहतूक बंद होते, त्यामुळे उशीर झाल्यास शेतकरी जिल्हयाच्या ठिकाणी मुक्काम करतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील वृक्ष नोंदणी व सातबाऱ्याची नोंदणी ही तलाठी व मंडळ अधिकाऱ्याकडून व्हावी याकरिता दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी मा.महसूल मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०१-२०१७) :**(१), (२), (३), (४), (५) व (६) गडचिरोली जिल्ह्यात झाडांचे सर्व फेरफार उपविभागीय अधिकारी यांनी निवासी उपजिल्ह्याधिकारी यांच्या पुर्वमंजूरीने घेण्याबाबत जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी दि.०१.११.२००१ रोजी ज्ञापन निर्गमित केले आहे. या कामाकरीता कोणत्याही शेतक-यास चौकशीकरीता अथवा बयानाकरीता जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बोलविण्यात येत नाही.

गडचिरोली जिल्ह्यात वृक्ष नोंदणी करण्यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी यांना अधिकार देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.महसूल मंत्री यांना निवेदन दिले होते. जिल्ह्यातील बहुमूल्य वनसंपत्तीचे जतन करण्याच्या उद्देशाने उक्त दि.०१.११.२००१ च्या ज्ञापनान्वये निर्णय घेण्यात आला असल्याने यामध्ये बदल करणे योग्य होणार नाही, ही बाब उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास दि.०१.०३.२०१६ च्या पत्राव्दारे जिल्हाधिकारी कार्यालयाने आणली आहे.

---

## मुंबईतील महालक्ष्मी येथील शक्ती मिलचा भूखंड ताब्यात घेण्याबाबत

**(१८) ४८६४२ (२०-०४-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महालक्ष्मी येथील शक्ती मिलचा भूखंड शासनाने ताब्यात घेण्याची कार्यवाही गेल्या काही वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी काही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) उक्त भूखंड शासनाच्या ताब्यात घेण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-१२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) लोअर परेल महसूल विभागातील भूकर क्र.६५ या श्री.शक्ती मिल्स लि.यांना शासकीय भाडेपट्टयाने दिलेल्या मिळकतीची भाडेपट्टा नुतनीकरण मागणी शासनाने अमान्य केली आहे. या मिळकतीचा कागदोपत्री ताबा घेऊन भूकर क्र.६५ ही मिळकत शासनाकडे निहित केलेली आहे. शासनाच्या या निर्णयाविरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट पिटिशन मध्ये मा.उच्च न्यायालयाने सदर मिळकतीबाबत पुढील कोणतेही आदेश पारीत करू नयेत असे आदेशित केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## रिसोड तालुक्यातील (जि.वाशिम) गोवर्धन येथे अनुसूचित जातीकरिता मंजूर झालेल्या घरकूलाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) ४९८५९ (२०-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड तालुक्यातील (जि.वाशिम) गोवर्धन येथे अनुसूचित जातीकरिता मंजूर झालेल्या घरकूलाकरिता वाढीव गावठाण जमीन मंजूर करुन जागा उपलब्ध करुन दयावी अशी मागणी मानवी हक्क अभियान या संघटनेने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या निवदेनावर निर्णय घेऊन मागासवर्गीयांना असणाऱ्या घरकुलासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१७)** :(१) होय.
(२) वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील सचिव/सरपंच, ग्रामपंचायत गोवर्धन यांनी घकुल बांधकामाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत केलेल्या अर्जानुसार तहसिलदार रिसोड यांच्या कार्यालयाकडून मागणी केलेली जागा मोजणीकरीता उप अधिक्षक, भूमि अभिलेख, रिसोड यांना कळविण्यात आले आहे. या प्रकरणी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर नियमानुसार जागा मंजूर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील कडा-शिरापूर-मेहकरी-आनंदवाडी-तराटे-वडगाव-पिंपरी या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२०) ५१४३५ (२९-०४-२०६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील कडा - शिरापूर - मेहकरी - आनंदवाडी - तराटे - वडगाव - पिंपरी या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे सातत्याने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्याबाबत आणि त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०३-२०१७)** :(१) होय
(२) प्रश्नाधीन रस्त्यापैकी भाग शिरापूर ते कानडी खुर्द ईजिमा-१०६ हा रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत दुरूस्ती करण्याचे काम जिल्हा परिषद बीड कडे प्रगतीत आहे.
कानडी आनंदवाडी पिंपरी घुमरी प्रजिमा-९ हा रस्ता सा. बां. विभागाच्या अखत्यारीत आहे. सदर रस्त्याचे दुरूस्तीचे काम निधि निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हवेली व खेड (जि.पुणे) तालुक्यातील शेतकऱ्यांना समान नुकसान भरपाई देणेबाबत**

**(२१) ५१४८२ (२८-०४-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र देहू तिर्थक्षेत्र विकास आराखड्यातील प्रस्तावित ३० मी. रुंद रस्त्यासाठी एकूण ६७ गटांमधील ५ हे.६ आर ६८ चौ.मी. इतके क्षेत्र संपादित करण्याचे काम सुरु असल्याचे माहे जानेवारी २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड तालुक्यातील जमिनींना प्रती गुंठा ५७ हजार व हवेली तालुक्यात ४ लक्ष २० हजार इतका भाव देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हवेली तालुक्यातील शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या नुकसान भरपाईनुसार खेड तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत स्थानिक लोकप्रतीनिधीनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, पुणे यांस निवेदन दिले आहे, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, हवेली तालुक्यातील तसेच खेड तालुक्यातील शेतकऱ्यांना समान नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०१-२०१७) :**(१) मौजे येलवाडी, ता.खेड येथील श्री.क्षेत्र देहू तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील ३० मी.रुंद रस्त्यासाठी एकूण ६७ गटापैकी ५०६६८ चौ.मी. संपादित क्षेत्राचा अंतिम निवाडा दिनांक २१.२.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आला आहे.

(२) मौजे येलवाडी, ता.खेड येथील श्री.क्षेत्र देहू तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील ३० मी. रुंद रस्त्यासाठी एकूण ६७ गटांपैकी संपादित क्षेत्राकरीता प्रति गुंठा रु.५७,८२४/- दर देण्यात आला आहे.

तसेच हवेली तालुक्यातील विठ्ठलनगर निवाड्याकरीता सर्व बाबी समाविष्ट करुन त्यावर १००% दिलासा रक्कम व त्यावर १२% व्याज याप्रमाणे प्रति आर ला रु.३,२५,०००/- ते ४,२०,०००/- पर्यंत दर देण्यात आलेला आहे.

देहूगावच्या निवाड्याकरीता सर्व बाबी समाविष्ट करुन त्यावर १००% दिलासा रक्कम व त्यावर १२% व्याज याप्रमाणे प्रति आर ला रु.४,०९,४२९/- ते ५,३२,२५८/- पर्यंत दर देण्यात आला आहे.

(३) स्थानिक मा.विधानसभा सदस्य यांनी दि.१.२.२०१६ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांस निवेदने दिले आहे.

(४) व (५) मौजे येलवाडी, ता.खेड येथील श्री.क्षेत्र देहू तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील ३० मी.रुंद रस्त्यासाठी एकूण ६७ गटांपैकी संपादित क्षेत्राकरीता भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम २६ च्या तरतुदीनुसार मुल्यांकन दर निश्चित करण्यात आला आहे.

दुय्यम निबंधक यांच्याकडून प्राप्त झालेल्या बागायत जमिनीच्या मूल्यांकनापेक्षा खरेदी-विक्री व्यवहाराचा हेक्टरी दर रु.२४,८६,५९५/- हा विचारात घेऊन त्यावर १०० टक्के दिलासा व मूळ किमतीवर ९९० दिवसांकरीता १२ टक्के व्याज देण्यात आले आहे.

सदर दरास सहायक संचालक, नगररचना, पुणे यांनी दि.१.१०.२०१४ व जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.१६.१०.२०१४ च्या पत्रान्वये मान्यता दिल्याने रु.५७,८२४/- प्रति गुंठा इतका दर निश्चित करण्यात आला असून त्यानुसार अंतिम निवाडा दि.२१.२.२०१५ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर निवाड्याच्या अधीनतेने नुकसान भरपाई रक्कम वाटपाची कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडे सुरु आहे.

प्रस्तुत निवाडा जाहीर करण्यात आला असल्याने संपादित जमिनीच्या मुल्यांकन दरामध्ये वाढ अथवा घट करण्याची बाब जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाच्या अखत्यारीत नाही. वाढीव मोबदल्यासंदर्भात सदर नुकसान भरपाईची रक्कम स्वीकारुन व जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयात आक्षेप/हरकत नोंदवून भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम १८ अनुसार मा.दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येतो. त्याप्रमाणे भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम १८ अन्वये वाढीव नुकसान भरपाई मोबदला मिळण्याबाबत श्री.कैलास गोविंद मोरे व इतर, श्रीकांत बाळकृष्ण मोरे व इतर १तसेच श्री.जालिंधरनाथ विश्वनाथ मोरे यांनी मा.जिल्हा न्यायालयात दावा दाखल केला आहे. त्यामुळे सदर बाब न्यायप्रविष्ट असून मा.दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांच्याविरुध्द करण्यात येईल.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथे नविन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत**

**(२२) ५१७६३ (२०-०४-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे नविन प्रशासकीय इमारत बांधण्यासंदर्भातील निवेदन तेथील लोकप्रतिनिधीं यांनी माहे डिसेंबर, २०१५ च्या दरम्यान संबंधित अधिकाऱ्यांकडे दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१२-२०१६)** :(१) भिवंडी, जि.ठाणे या तहसिल कार्यालयाच्या नुतनीकरणाच्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.०७/१२/२०१५ चे निवेदन मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांना दिले आहे.

(२) व (३) सदर निवेदनातील मागणीबाबत आवश्यक कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना शासनाने कळविले होते. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविल्यानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ यांनी भिवंडी तहसिल

कार्यालयाचे नुतनीकरण करण्यासाठीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे सादर केले आहे. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यावर पुढील उचित कार्यवाही करण्याचे संकल्पिक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयातील इनामी जमिनीवरील घरे अधिकृत करण्याबाबत

**(२३) ५२३८३ (२०-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात इनामी जमिनीवरील घरे अधिकृत करण्याची मागणी होत असतानाच शासनाने नुकतेच या जागा ताब्यात घेण्याबाबतच्या नोटिस बजावल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नोटिसामुळे इनामी जमिनधारकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असून याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन शासन स्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करयात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :**(१) महालेखापाल नागपूर यांनी सन २००७-०८ च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये करवीर तालुक्यातील इनाम जमिनीवरील अनधिकृत घरांच्या बाबतीत घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने तहसिलदार करवीर यांनी संबंधितांना नोटीसा बजावल्या होत्या.
(२) व (३) दंडाची आकारणी चुकीच्या पध्दतीने केली असल्याचे निवेदन इनाम जमिन धारकांनी दिले होते, त्याची तपासणी करण्यात आली असून टेंबलाईवाडी येथील ११५ प्लॉटधारकांपैकी ७९ प्लॉटधारकांनी १,४०,२९,००६/- इतकी रक्कम शासनाकडे भरली आहे. करवीर येथील ७ खातेदारांपैकी ४ खातेदारांकडून रु.६,२४,४०२/- इतकी रक्कम व का।। बावडा येथील २२ खातेदारांपैकी २ खातेदार यांचेकडून रु.१,४१,१६५/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. ज्या प्लॉट/खातेधारकांनी थकबाकीची रक्कम भरली नाही त्या मिळकतीस महाराष्ट्र शासनाचे नाव दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चिपळूण व गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यात नाबार्डच्या निधीतील पुलांच्या पोहोच मार्गासाठी निधी देण्याबाबत

**(२४) ५४१२२ (२९-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यातील गोंधळे-पोसरे, गुहागर तालुक्यातील आरे राममंदिर आणि वेळणेश्वर भाटी - वेळणेश्वर या पुलांचे काम नाबार्ड योजनेतून पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलांना पोहोच मार्ग नसल्याने हे पूल वाहतुकीविना आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलांच्या पोहोच मार्गासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून वारंवार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पुलांच्या पोहोच मार्गासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७)** :(१), (२) व (३) होय.

(४) व (५) प्रश्नांकित पुलांच्या पोहोच मार्गाचे काम प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यातील इनामी जमीन दंड आकारुन नियमीत करण्याबाबत**

**(२५) ५६४२५ (१९-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इनामी जमीन दंड आकारुन नियमीत करण्यात येणार असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९६७ पासुन देवस्थान जमीनीचा निर्णय प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील १७ हजार १२१ देवस्थानांना २ लाख ३५ हजार व १ जमीन इनाम म्हणून देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देवस्थान जमिनी नियमीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६)** :(१) महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९५० महाराष्ट्र परागणा व कुळकर्णी वतने (नाहिशी करण्याबाबत) अधिनियम, महाराष्ट्र (समाजास उपयुक्त) सेवा इतनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, हैद्राबाद इनामे रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४, महाराष्ट्र विलिन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहिशी करण्याबाबत अधिनियम, १९५५, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, महाराष्ट्र शेतजमिन

(जमिन धोरणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम, १९६२ यामध्ये अन्यथा तरतूद केलेली असेल त्याव्यतिरिक्त शासनाने, भोगवटदार वर्ग-२ च्या धारणाधिकार किंवा पट्टेदारी हक्कांवर दिलेल्या जमिनीच्या विभिन्न प्रवर्गाच्या बाबतीत विहित करण्यात येईल असे रुपांतरण अधिमूल्य भरल्यावर आणि विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तीच्या अधिन राहून, वर्ग एकच्या भोगवट्यात रुपांतरीत करण्यासंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मध्ये कलम २९ अ दाखल करयात आला आहे. याबाबतचा सन २०१६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५) राज्यातील देवस्थान जमिनींच्या संदर्भातही शासनाची भूमिका ठरविण्याकरीता अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्याकरीता शासननिर्णय क्र.जमीन २०१६/प्र.क्र.१००/ज-१ दि. २३ मार्च, २०१६ अन्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचाही निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या कार्यकक्षेनुसार समितीचा अभ्यास सुरु असून समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

## पिंपळगाव कुडा (जि.बुलढाणा) येथील खडकपूर्णा नदीपात्रातील रेती घाट रद्द करण्याबाबत

**(२६) ५६७५३ (१९-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव कुडा (जि.बुलढाणा) येथील खडकपूर्णा नदीपात्रातील रेती घाटाची चौकशी करून घाट रद्द करण्यात यावा, अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक २२ मे, २०१६ रोजीच्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आह काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने घाट रदद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१२-२०१६) :**(१) पिंपळगाव कुडा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील रेतीघाट रद्द करण्याबाबत दि.१२/५/२०१६ रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे ग्रामस्थांकडून निवेदन प्राप्त झाले होते.

(२) व (३) सदर निवदेनाच्या अनुषंगाने तहसिलदार सिंदखेडराजा यांनी तक्रारकर्ते ग्रामस्थ यांच्यासमक्ष चौकशी केली असता, सदर रेतीघाट हा शासन नियमाप्रमाणे चालू असल्याचे तसेच लिलावधारक लिलावाच्या अटी व शर्तीचे पुर्णपणे पालन करीत असल्याने निदर्शनास आले. त्यामुळे तक्रारकर्त्यांनी सदर अर्ज गैरसमजूतीतून दिलेला होता आणि सदर

रेतीघाटाबाबत कोणतीही तक्रार नसून, सर्व तक्रार अर्ज खारीज करुन, लिलावधारक व इतर कोणावरही कोणतीही कारवाई न करण्याबाबत ग्रामस्थांनी तहसीलदार सिंदखेडराजा यांना लेखी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापुर जिल्हयातील महसूल कर्मचारी संघटनेने केलेले आंदोलन

**(२७) ५६८६९ (१९-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर जिल्हयातील महसूल कर्मचारी संघटनेने आपल्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत दिनांक १० मार्च, २०१६ रोजी पासून आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकारी, कोल्हापूर तसेच शासनाकडे गेले दोन वर्षापासून सतत वारंवार निवेदने देऊनही अदयापपर्यत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांच्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१७) :**(१), (२), (३) व (४) राज्यातील सर्व जिल्हयात महसूल कर्मचारी संघटनेने दि.१०.०३.२०१६ रोजी पासून आंदोलन सुरु केले होते.
तथापि, याबाबत महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या सदस्यांसोबत त्यांच्या मागण्यांसंदर्भात प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती व त्यानुषंगाने सदर संघटनेने आपले आंदोलन मागे घेतले. संघटनेच्या विविध मागण्याबाबत पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेवानिवृत्ती व बदली नंतर शासकीय इमारतीत अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या अधिकाऱ्यांनी भाडे न भरल्याबाबत

**(२८) ५७११४ (२४-०८-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेवानिवृत्ती व बदली नंतर शासकीय इमारतीत अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या अनेक आजी-माजी अधिकाऱ्यांनी नियमानुसार भरावे लागणारे भाडे अद्यापही न भरल्याने लाखो रुपयांची थकबाकी निर्माण झाली असल्याची माहिती आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली

यांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली असून त्यामध्ये सुमारे ६० ते ७० लाखांची रक्कम विविध व्यक्तींकडून येणे बाकी असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या यादीमध्ये बदली नंतर निवासस्थान सोडले नाही अशांमध्ये डॉ.अश्विनी जोशी(३ लाख, ६ हजार), कमलाकर फंड (१८ लाख ४७ हजार), अविनाश झाडे (४ लाख २२ हजार), अनिल सोनटक्के (१ लाख ११ हजार), धनाजी तोरस्कर (५ लाख ५ हजार), प्रकाश राहुले (२ लाख ४३ हजार) माजी अतिरिक्त न्यायाधीश (११ लाख ९६ हजार) पंकज शाह (३ लाख २२ हजार), काशिनाथ जाधव (२ लाख ४६ हजार), सुतार पांचाळ (३ लाख ९६ हजार) हे आहे व त्यांच्याकडे नमुद रक्कम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य पोलीस दक्षता समिती सदस्य प्रेमकुमार जैन, माजी प्रधान सचिव यांनी ९ लाख ८१ हजार थकवून दिवाणी न्यायालयात राज्य शासनाविरोधात दावा दाखल केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाचे भाडे थकविणाऱ्या थकबाकीदारांविरोधात शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

डॉ.अश्विनी जोशी व श्री. अविनाश झाडे यांना नियमित दराने भाडे आकारणीचे आदेश शासनाने मंजूर कले असून डॉ. जोशी यांची नियमित दराने भाडे वसुली झालेली आहे. तसेच श्री. झाडे यांची नियमित दराने घरभाडे वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे. उर्वरित अधिका-यांकडील घरभाडे वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.

तथापि, श्री.प्रेमकुमार जैन यांनी दिवाणी न्यायालयात दाखल केलेला दावा दिवाणी न्यायालयाने फेटाळला असून त्यांच्याकडील निवासस्थान रिक्त करुन घेण्यात आले आहे. तसेच प्रलंबित रकमेच्या वसुलीबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) ज्या अधिकाऱ्यांनी शासकीय निवासस्थान अद्यापही रिक्त केलेले नाही अशा अधिकाऱ्यांना शासकीय निवासस्थान रिक्त करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून त्याच्याकडून भाड्याची थकबाकी न भरल्यास सक्षम प्राधिकारी यांच्या न्यायालयात निष्कासन प्रकरण दाखल करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद शहरात महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या मदतीने रस्ते बांधण्याबाबत

**(२९) ५७१४९ (३०-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात शासनाने शहर एकात्मीक रस्ते विकास योजनेंतर्गत सन २००१ मध्ये उड्डानपूल व रस्ते बांधा, वापरा, हस्तांतरीत करा या तत्वावर रस्ते विकास महामंडळाच्या मदतीने करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात ५ उड्डानपूल, ५ रेल्वे उड्डानपूल, ३ सबवे, १ पूल व १६ रस्ते अशी एकुण ३० कामांना मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामे करतांना सर्वसामान्य नागरिकांची घरे पाडण्यात आल्याने नागरिकांनी या कामांना विरोध केला असून शासनाने याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सदर ३० कामांपैकी किती कामे आतापर्यंत पूर्ण झाली आहेत व १३७ कोटी ८० लाख रुपयांपैकी किती निधी यावर खर्च झाला आहे व किती कालावधीत सदर कामे पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदरची जागा ही सार्वजनिक बांधकाम विभाग व महानगरपालिका औरंगाबाद यांच्या अखत्यारितील असल्याने सदर कामे करताना शासन निर्णयातील तरतूदीनुसार लागणारी जागा अतिक्रमण मुक्त करुन देण्याची जाबाबदारी ही संबंधित विभागांची आहे.
(४) एकूण मंजुर ३० कामांपैकी २४ कामे पूर्ण झाली, ०२ कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात आली असून ४ कामे अद्याप सुरु झाली नाहीत. औरंगाबाद शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पाची एकूण किंमत रु.१६७.८० कोटी (सन २००१) वरुन रु.४६३.०३ कोटी (सन २०१६) एवढी अपेक्षित असल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यतेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. आजतागायत या योजनेवर एकूण ३०९.२१ कोटी खर्च झाला असून सुधारीत प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यावर उर्वरीत कामे हाती घेऊन पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

### ठाणे व रायगड जिल्ह्यातील कातकरी या आदिवासी जमातीच्या वस्तीस्थानाबाबत

**(३०) ५७५१० (१९-०८-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: ठाणे व रायगड जिल्ह्यात आदिवासी जमात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कातकरी आदिवासी समाजाच्या वस्ती स्थानाबाबत शासनाने गांभीर्याने निर्णय घेण्याचे आदेश माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी मा.राज्यपाल महोदयांनी शासनान दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमातीच्या वास्तव्याचा अभ्यास करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालात कातकरी जमातीच्या विकासाकरिता कोणत्या उपाययोजना सूचविण्यात आल्या आहेत व त्याची अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) कातकारी समाजाच्या घरभाट व गावठाणाखालील जमिनीबाबत व त्यांच्या अन्य प्रश्नांबाबत दि.१२.१०.२०१५ रोजी मा.राज्यपाल महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीतील निर्णयानुसार कातकारी जमातीतील व्यक्तींच्या घरांखालील जागांची समस्या याबाबींचा सर्वकष अभ्यास करण्यासाठी तसेच या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रशासकीय कामकाजाची दिशा व कार्यपध्दती निश्चित करण्याकरीता व सदर प्रश्नांचा सर्वंकष अभ्यास करुन शासनास शिफारस करण्याकरीता विभागीय आयुक्त कोकण यांच्या अध्यक्षतेखाली शासन परिपत्रक क्र. बैठक.२०१५/प्र.क्र.२४३/ज-१, दि.१९.१०.२०१५ अन्वये समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने याबाबत अभ्यास करुन आपल्या शिफारशीसह दि.२०.०१.२०१६ रोजी अहवाल शासनास सादर केला आहे.

सदर समितीच्या अहवालामध्ये खाजगी, शासकीय व शासनअंगीकृत महामंडळाच्या जमीनींवरील कातक-यांच्या घरठाणांबाबत व गावठाणाबाबतच्या शिफारशींचा समावेश आहे. या व्यतिरिक्त आदिवासी विकास व वन विभागाशी संबंधित अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ अंतर्गत वन जमिनीवरील कातक-यांच्या घरठाणांबाबत करावयाच्या उपायोजनांचा समावेश आहे.

शासकीय जमीनींवरील कातक-यांच्या घरठाणांबाबत विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांना दि.२७.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

खाजगी व शासन अंगीकृत महामंडळाच्या जमिनींवरील कातकऱ्यांच्या घरठाणांबाबत व गावठाणाबाबत शिफारशींच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**गडहिंग्जल (जि.कोल्हापूर) तालुक्यातील क्रशरचालक व खाणपट्टा धारकांनी शासनाच्या जाचक अटीबाबत दिलेले निवेदन**

**(३१) ५७५६९ (१९-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्जल (जि.कोल्हापूर) तालुक्यातील क्रशरचालक व खाणपट्टा धारकांनी शासनाने घातलेल्या जाचक अटीबाबत प्रांताधिकारी यांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने क्रशरचालक व खाणपट्टाधारकांवर शासनाने घातलेल्या जाचक अटी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१२-२०१६) :**(१) अशा प्रकारचे निवेदन उपविभागीय अधिकारी गडहिंग्लज यांच्याकडे प्राप्त झाले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील देवलापार येथे नविन अप्पर तहसिलदार कार्यालय निर्माण करणेबाबत**

**(३२) ५८९२९ (१९-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील देवलापार येथे नविन अप्पर तहसिलदार कार्यालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे माहे फेब्रुवारी, २०१६ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील देवलापार येथे नवीन अप्पर तहसिलदार कार्यलयाची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रलंबित असलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०२-२०१७) :**(१), (२), (३) व (४) नागपूर जिल्ह्यातील देवलापार येथे अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेली पदे व त्याकरीता येणारा खर्च याबाबतच्या प्रस्तावास वित्त विभाग व उच्चस्तरीय सचिव, समितीची मान्यता घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

---

**नांदेड येथील तख्त श्री.हुजुर साहिब गुरुव्दारा बोर्डाने केलेला गैरव्यवहार**

**(३३) ५९४९९ (१९-०८-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील तख्त श्री.हुजुर साहिब गुरुव्दारा बोर्डाने काढलेल्या सफाई कामगारांच्या एजन्सी करिताच्या निविदा दिनांक १५ जून, २०१५ रोजी उघडण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील निविदेमध्ये तीन एजन्सीजनी निविदा भरलेल्या होत्या त्यापैकी पेन एजन्सी चे दर सर्वात कमी असतांना त्यांना डावलून गुरुव्दारा बोर्डाने आरएसएस या कंपनीला नियमबाहयरित्या काम दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे न करता त्यात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) नांदेड येथील तख्त श्री.हजूर साहेब सचखंड गुरुव्दारा बोर्डाने गुरुव्दारा व परिसरात साफ सफाईसाठी सफाई कामगार कंत्राटदाराकडून निविदा मागविल्या होत्या. या निविदांच्या पहिल्या चरणामध्ये दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे निविदा सादर करण्यास

पहिली मुदतवाढ देण्यात आली. या पहिल्या मुदतवाढीच्या कालावधीमध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा दोन लिफाफा पध्दतीवर मागविण्यात आलेल्या होत्या. सदर ३ निविदांपैकी केवळ बी.व्ही.जी.इंडिया, पुणे हि पात्र ठरत होती व त्यांचे दर सर्वात जास्त होते. उर्वरित दोन निविदाधारक म्हणजेच रेनॉल्ड सिस्युरिटी, चंद्रपूर यांच्याकडे निविदा सुचनांमध्ये नमूद केल्यानुसार गृह व्यवस्थापनाचा ५ वर्षाचा अनुभव नसल्याने तसेच उपलब्ध मनुष्यबळाची यादी सोबत दिलेली नसल्यामुळे ते अपात्र ठरत होते. तसेच दुसरा निविदाधारक म्हणजेच प्रेशस इंटरप्रायझेस, नांदेड यांनी निविदेसोबत ५ वर्षाच्या अनुभवाचे कोणतेही कागदपत्र सादर केलेला नाहीत व सनदी लेखापाल यांचे अहवालानुसार या संस्थेच्या आर्थिक व्यवहारातील सर्व बाबी या मद्य विक्री आणि खोली भाडे यांचेशी निगडीत होत्या. त्यामुळे सदर निविदाधारक देखील तांत्रिकदृष्ट्या अपात्र असल्याचे दिसून येते. पात्र निविदाधारकाचे दर सर्वात जास्त होते. उर्वरित दोन अपात्र निविदा धारकांपैकी दुस-या क्रमांकावरील दर असलेल्या रेनॉल्ड सिक्युरिटी यांना कार्यारंभ आदेश देण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे सकृतदर्शनी सदर निविदा प्रक्रिया अंतिम करतांना सदर गुरुव्दारा बोर्डाकडून अनियमितता झाल्याचे निदर्शनास येते.

वरीलप्रमाणे अनियमिततेच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत दि.३१.८.२०१६ च्या शासन पत्रान्वये जिल्हाधिकारी, नांदेड यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तहसिल कार्यालय, पेण (जि.रायगड) येथील तलाठी संवर्गातील काही कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ न दिल्याबाबत**

**(३४) ५९७६७ (१९-०८-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हातील विशेषत: तहसिल कार्यालय, पेण येथील तलाठी संवर्गातील काही कर्मचाऱ्यांना सन २०१० मध्ये आश्वासित प्रगती योजनेतंर्गत वरीष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मिळणे अपेक्षित असतानाही अद्याप सहा वर्षे उलटूनही सदरहू लाभ देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधितांनी दिनांक २४ जून, २०१३, १९ जुलै, २०१३, ७ जुलै, २०१४, ९ जुलै, २०१४, २ ऑगस्ट, २०१४, १९ ऑगस्ट, २०१४, २४ नोव्हेंबर, २०१४ व दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी प्रांत कार्यालय, अलिबाग तसेच तत्कालीन मा.महसूल मंत्री महोदयांकडेही दिनांक १ ऑगस्ट, २०१३ व २१ ऑगस्ट २०१४ रोजी व तदनंतरही पुन्हा दिनांक ४ एप्रिल, २०१६ व ४ जुलै, २०१६ रोजी लेखी निवेदने देवून तहसलिदार, पेण तसेच वरीष्ठ अधिकाऱ्यांना वारंवार भेटून मौखिक विनंती करूनही कोणती कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मशा / आस्था-१ / अ-८(१) / तलाठी / पहिला / २०१५, दिनांक २२/०५/२०१५ या स्वयंस्पष्ट आदेशान्वये सतत सेवा १२ वर्षे पूर्ण झाल्याने या कारणास्तव संबंधित तलाठ्यांना आश्वासित प्रगती योजने अतंर्गत पहिला लाभ (मंडळ अधिकारी संवर्गातील वेतन श्रेणी) मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू आदेश ५ वर्षे विलंबाने पारित होऊनही आदेशानंतर एक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप उपरोक्त वेतनश्रेणीचा लाभ संबंधित तलाठ्यांना न देण्यामागील कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीच्या अनुषंगाने सदर तलाठ्यांचे मागील ६ वर्षापासून वेतन श्रेणी न मिळाल्याने झालेले आर्थिक नुकसान पाहता सदर थकबाकी व्याजासह देवून त्यांना आश्वासित प्रगती योजनेअतंर्गत वरीष्ठ वेतन श्रेणी त्वरीत लागू करुन सदरहू प्रकरणी वारंवार लेखी व मौखिक विनंती करुनही दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१२-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) रागयड जिल्ह्यातील तहसिल कार्यालय, पेण अंतर्गत तलाठी पदावर कार्यतर असलेले एक कर्मचारी दिनांक १७/०४/२०१० रोजी आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पहिल्या लाभासाठी पात्र ठरत होता. तथापि, सदर कर्मचारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने, त्यास सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ अनुज्ञेय करण्यास जिल्हा पदोन्न्ती समितीकडून अपात्र ठरविण्यात आलेले होते. तद्नुसार त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रासह परिपूर्ण प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांचेमार्फत दिनांक १६/०१/२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त झाल्यावर, त्यांच्यासह अन्य प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील तलाठी संवर्गातील कर्मचा-यांना १२ वर्षाच्या सतत सेवे नंतर सुधारित आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पहिला लाभ देण्यासाठी दिनांक ०७/०७/२०१५ रोजी जिल्हा पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत जिल्हा पदोन्नती समितीने दिलेल्या मान्यतेनुसार दिनांक २२/०७/२०१५ च्या आदेशा अन्वये पात्र तलाठी कर्मचाऱ्यांना सुधारित प्रगती योजनेंतर्गत पहिला लाभ मंजूर करण्यात आला आहे. सदर आदेशात तहसिल कार्यालय, पेण येथील कार्यरत असलेल्या उक्त तलाठी कर्मचा-यांचा समावेश आहे. आदेश पारीत केल्यानंतर पेण येथील कार्यरत उक्त तलाठी दिनांक ०९/०८/२०१५ ते दिनांक २०/०१/२०१६ या कालावधीत विना परवाना गैरहजर होता. उक्त कर्मचारी दिनांक २१/०१/२०१६ रोजी तलाठी पदावर हजर झाल्यानंतर त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासंदर्भात कार्यवाही तहसिलदार, पेण यांच्या मार्फत करण्यात आलेली असून, त्याची मंडळ अधिकारी संवर्गात वेतन निश्चिती करण्यात येऊन फरकाची रक्कम दिनांक ०८/०७/२०१६ रोजी अदा करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगावबाजार (जि.नांदेड) तालुक्यात बेकायदेशीररित्या वाळूची वाहतूक करणारे ११ टिप्पर व ३ ट्रॅक्टर ताब्यात घेतल्याबाबत

**(३५) ६१०३६ (१९-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगावबाजार (जि.नांदेड) तालुक्यात शासनाचा महसूल न भरता बेकायदेशीररित्या वाळूची वाहतूक करणारे ११ टिप्पर व ३ ट्रॅक्टर महसूल विभागाने कार्यवाही करुन ताब्यात घेतले असल्याचे दिनांक १५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने वाळूची वाहतूक करणाऱ्यांवर व पकडलेल्या टिप्पर व टॅक्टरवर शासनाने कोणती कारवाई केली आहे व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०२-२०१७)** :(१), (२) व (३) नायगाव तालुक्यात (जि.नांदेड) दिनांक १५ मे,२०१६ रोजी वाळूची अवैध वाहतूक करणारे ११ टिप्पर ताब्यात घेण्यात आले होते. सदर वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन, रुपये २,०५,४००/- एवढया दंडाची रक्कम वसूल करुन, शासनजमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातपाटी (जि.पालघर) किनारपट्टीचा संरक्षक बंधारा ढासळल्याने मच्छिमारांची घरे धोक्यात आल्याबाबत**

**(३६) ६२१९६ (२४-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातपाटी (जि.पालघर) किनारपट्टीचा संरक्षक बंधारा ढासळल्याने मच्छिमारांची घरे धोक्यात आल्याबाबत दिनांक २० जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंधारा दुरुस्तीच्या पहिल्या टप्प्याच्या निधीचा प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१६)** :(१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ४७११ या राज्यस्तरीय योजनेअंतर्गत सदर कामासाठी ४००.०० मी.लांबीसाठी रु.५००.०० लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रु.१०८.७० लक्ष एवढी तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. सदरचे काम पर्यावरण विभागाची परवागनी व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन निधीच्या उपलब्धतेनुसार सुरु करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे दौंड व गार (जि.पुणे) येथील भीमा नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(३७) ६२८५४ (२४-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील दौंड व मौजे गार येथील भीमा नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर पुलास मंजुरी व निधीची तरतूद करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०२-२०१७) :**(१) होय

(२) व (३) प्रश्नाधीन पुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

### माहूर (जि.नांदेड) नगरपंचायतीने कार्यालयासाठी जागेची मागणी केल्याबाबत

**(३८) ६३०५२ (१९-०८-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील माहूर नगरपंचायतच्या सध्याच्या इमरतीचा परिसर एक एकरपेक्षा अधिक असतानाही शहराबाहेर गायरान जमीनीतील गट क्र. १९५ मध्ये १ हेक्टर २० आर जागेची मागणी न.प प्रशासनाच्या वतीने जिल्हा प्रशासनाकडे केली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी तत्कालीन मुख्याधिकारी आणि विद्यमान तहसिलदार यांनी सभागृहासोबत चर्चा करुन ठराव केला आणि जागा लवकर हस्तांतरीत व्हावी यासाठी शिघ्र गणकानुसार रु १ कोटी ८ लाख ६७ हजार ५०० रुपये दिनांक १४ मार्च, २०१५ रोजी जमा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास हा व्यवहार करताना ही जागा कोणत्या प्रकाराची आहे यांचा न.पं. ने नगररचना विभागाचा अभिप्रायच घेतला नसल्याने माहूर नगरपंचायतीचे एक कोटी रुपये अडकून पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने माहूर नगरपंचायतीचे एक कोटी रुपये अडकून पडल्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१२-२०१६)** :(१) व (२) नगर पंचायत माहूर ही दिनांक २२/०६/२०११ रोजी अस्तित्वात आली आहे. अद्यापही नगरपंचायतचे कामकाज पूर्वीच्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीत चालू आहे. सदरचा परिसर हा बस स्थानकासमोर असून मुख्यत: वाणिज्यिक प्रयोजनासाठी आहे. तसेच सदर ठिकाणी नगरपंचायतचे व्यापारी संकुल बांधण्याचे प्रस्तावित आहे. भविष्यातील शहराची वाढ व विकास लक्षात घेता नगरपंचायत माहूर कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीसाठी तालुक्याचे सर्व मुख्य कार्यालय असलेल्या प्रशासकीय इमारतीसमोरील गायरान जमीन क्र.१९५ क्षेत्र १.२० हे. जागेची मागणी नंतर पंचायतीने जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडे प्रस्ताव सादर करुन जागा रितसर मंजुर करुन घेतली. दिनांक २९/०३/२०१६ अन्वये सदर जमिनीचा ताबा रु.१,०८,६२,५००/- एवढी रक्कम नगरपंचायत कडून शासन खाती जमा करुन मुख्याधिकारी, नगरपंचायत, माहूर यांना देण्यात आला आहे. त्याप्रमाणे महसूली अभिलेख्यांमध्ये फेरफार घेण्यात आलेला आहे व या ठिकाण प्रस्तावित नगरपंचायत, माहूरची प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याची कार्यवाही चालू आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तेल्हारा (जि.अकोला) तहसील कार्यायालने विद्यार्थ्यांना वितरीत करावयाच्या प्रमाणपत्रामध्ये त्रुट्या काढल्याबाबत**

**(३९) ६३३३१ (१९-०८-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील तेल्हारा येथील तहसिल कार्यालयाने माहे जून, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात शैक्षणिक सत्राचे प्रारंभीस विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्राचे वितरण करताना किरकोळ त्रुट्या काढून विद्यार्थ्यांची अडवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ३०० प्रकरणात किरकोळ त्रुट्या काढून प्रमाणपत्र वितरीत करण्यास टाळाटाळ केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याप्रकरणी मुख्यत्वे जातप्रमाणपत्र व नॉनक्रिमीलेअरच्या राज्य व केंद्र शासनाच्या वेगवेगळा नमुना असताना तसेच ऑनलाईन प्रक्रिये दरम्यान त्रुटी असल्याने, केंद्र शासनाचा (लोकसेवा आयोग) ऑफलाईन तयार केलेला नमुना नाकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ऑनलाईन प्रमाणपत्र शक्य नसेल किंवा वेगळा नमुना असेल अशावेळी ऑफलाईन प्रक्रिया राबविण्यासाठी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत काय वा देण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१७)** :(१), (२), (३), (४) व (५) दिनांक ०४.०६.२०१६ ते १९.०६.२०१६ या कालावधीत अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात नॉनक्रिमीलेअर व जातप्रमाणपत्रासाठी ८३० अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी साधारणपणे १७८ प्रकरणे तांत्रिक त्रुटी

असल्याने महा ई-सेवा केंद्राकडे परत पाठविली होती. विभागीय जात प्रमाणपत्र समिती, क्र.२ अकोला, यांचे पत्र दिनांक २०.११.२०१४ मधील विहीत नमुन्यात जातीचे दाखला देण्याबाबत निर्देश असल्याने तत्कालीन प्रभारी उपविभागीय अधिकारी, अकोट यांनी त्यानुसार कार्यवाही केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांत तलाठ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४०) ६३४४९ (०१-०९-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांत तलाठ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याची बाब माहे जून, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तलाठ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-१२-२०१६) :**(१), (२) व (३) बीड जिल्हा अंतर्गत येणा-या आष्टी, पाटोदा व शिरुन तालुक्यात जून, २०१६ च्या तिस-या सप्ताहात व त्या सुमारास तलाठी संवर्गाची एकूण २० पदे रिक्त होती. शासनाच्या दिनांक २३.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व जिल्ह्यात दिनांक ११.०९.२०१६ या एकाच दिवशी परीक्षा घेवून तलाठी संवर्गाची पदे भरण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार बीड जिल्ह्यत दिनांक ११.०९.२०१६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली असून सदर भरती प्रक्रियेतून रिक्त पदावर नविन तलाठ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात गायरान जमिनीवर अतिक्रमण केलेल्यांना नोटीस दिल्याबाबत**

**(४१) ६३६१३ (०७-०८-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील गायरान जमिनीवर अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर यांच्या घरासह समाजमंदिर, शाळा, स्मशानभूमी इ.बांधकाम करण्यात आले असल्याने त्यांना महसूल विभागामार्फत नोटीस पाठविण्यात आल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या महसूल विभागामार्फत पाठविण्यात आलेल्या नोटीसांनुसार रहिवाशांवर कारवाई करण्यात येणार नाही अशी घोषणा शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर ठिकाणी राहणाऱ्या नागरीकांनी बांधलेली घरे व इतर बांधकामे नियमानुकुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१२-२०१६) :**(१) शासनाच्या महाराजस्व अभियानांतर्गत सोलापूर जिल्हयातील विविध तालुक्यातील शासकीय गायरान जमिनीवर निवास, वाणिज्य व कृषी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे काढणेबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ५० अन्वये संबंधितांना नोटीसा देण्यात आल्या आहेत.
(२) नाही.
(३) व (४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. जमीन ०३/२०११/प्र.क्र.५३/ज-१, दि.१२ जुलै, २०११ प्रमाणे ज्या प्रकरणात शासनाच्या निर्णयाव्दारे भूमीहीन शेतमजूर, अनुसूचित जाती/जमातीतील व्यक्ति इत्यादींचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत यापूर्वीच निर्णय घेण्यात आला आहे, अशी अतिक्रमणे तसेच शाळा, दवाखाना किंवा इतर सार्वजनिक प्रयोजनार्थ बांधकाम यांची अगोदरच अस्तित्वात असलेली अतिक्रमणे वगळता गायरान/गुरचरण व गावाच्या सार्वजनिक वापरातील जमिनीवरील अन्य प्रयोगनांसाठी झालेली अतिक्रमणे तथा अनाधिकृत बांधकामे फार जूनी असली व बांधकामावर फार खर्च केला असला तरी निष्कासीत करण्याची कार्यवाही करणेबाबत निर्देश असल्यामुळे सदर अतिक्रमण नियमित करता येणार नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेगांव (जि.बुलढाणा) येथील श्री. संत गजानन महाराज संस्थान, शेगांव या संस्थेस आनंदसागर या प्रकल्पाचा जमीनभाडे पट्टा वाढवून देण्याबाबत**

**(४२) ६३९४६ (१९-०८-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेगांव (जि.बुलढाणा) येथील श्री. संत गजानन महाराज संस्थान शेगांव या आध्यत्मिक व सेवाभावी संस्थेस आनंदसागर या प्रकल्पाचा जमीनभाडे पट्टा वाढवून देण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मागील दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी उलटून सुध्दा अधिकाऱ्यांच्या वेळकाढू धोरणामुळे सदर मंजूर प्रस्ताव रखडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्ताव परिपुर्ण दस्तऐवजासह मंजूरीसाठी शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदर प्रस्तावास शासन कधी मंजूरी प्रदान करणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१२-२०१६) :**(१), (२), (३), (४), (५) व (६) श्री.गजानन महाराज संस्थान शेगांव, जि.बुलढाणा या संस्थेने मौजे शेगाव भाग-२, ता.शेगाव येथील स.क्र.२२५ व २४७ मधील जमिनीचा भाडेपट्टा वाढवून देण्याची मागणी केली होती. याबाबतच्या विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या कार्यालयाकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिक माहिती क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त केल्यानंतर तसेच संबंधित विभागांशी सल्लामसलत करुन शासनाने दि.१९.०७.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये आनंदसागर या प्रकल्पासाठी उक्त १०१.३२ हे. आर जमीन ३० वर्षाकरीता रुपये १/- या नामपात्र वार्षिक भूईभाडेपट्याने सदर संस्थेस मंजूर केली आहे.

---

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अंध व अपंग व्यक्तींना प्राधान्याने व सवलतीने जमीन देण्याबाबतच्या योजनेची अमंलबजावणी होत नसल्याबाबत**

**(४३) ६४५०० (१९-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन निर्णय क्रमांक जमीन १०/३००३/प्र.क्र.४०१/ज-१ मंत्रालय मुंबई दिनांक २५ जुलै, २००७ आणि अधिसूचना, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ दिनांक ७/०१/२००८ (३१ अ) नुसार अंध व अपंग व्यक्तिंना व्यवसायासाठी प्रधान्याने व सवलतीने जमीन देण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवासी वाणिज्यिक व औद्योगिक अंध व अपंगांसाठी विशेष करमणुक केंद्र स्थापन करण्यासाठी, अंध अपंगाच्या शाळेसाठी, अंध अपंगाच्या संशोधन कैंद्रासाठी २०० स्केअर फुट जमीन उपलब्ध करुन देणे स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शासन निर्णयाची व अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शासन निर्णयाची व अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) शासन निर्णय क्र. जमीन १०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१, दिनांक २५.०७.२००७ व महाराष्ट्र जमीन महसूल (सहकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम-३१ अ मधील अटी व शर्तीनुसार यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे.

त्यानुसार विकलांग व्यक्तींना रसवंती केंद्र, दुरध्वनी केंद्र, झेरॉक्स केंद्र इत्यादी करीता जागा वितरीत करताना जमिनीच्या चालू बाजारमुल्याच्या रक्कमेवर सवलतीची किंमत आकारुन कब्जेहक्काने अथवा सवलतीचे वार्षिक भुईभाडे आकारुन भाडेपटट्याने जागा मंजूर करण्यात येतात. अशा अंध व अपग व्यक्तींना उक्त शासन निर्णय क्र.जमीन १०/२००३/ प्र.क्र.४०१/ज-१, दिनांक २५.०७.२००७ अन्वये विविध प्रयोजनाकरिता निश्चित केलेल्या सवलतीच्या दराने शासकीय जमीन मंजूर करण्याची कार्यवाही प्राप्त मागणी व जमीनीची उपलब्धता विचारात घेऊन क्षेत्रीय यंत्रणेकडून करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील संगमेश्वर-तांबेडी मार्गावरील धोकादायक दरडीबाबत

**(४४) ६४५२८ (२४-०८-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील संगमेश्वर-तांबेडी मार्गावर असलेली दरड धोकादायक स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोकादायक दरड यापूर्वीही पावसाळ्यात कोसळल्याने मार्गावरील वाहतूक आठ दिवस बंद होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची धोकादायक दरड काढणे व सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१) व (२) नाही.

माहे मे, २०१४ मध्ये सदर रस्त्यावरील कि.मी. ११/०० ते ११/३०० या लांबीमध्ये चढ सुधारणा (Grade improvement) चे काम चालू असताना मोठ्या वाहनांसाठी ८ दिवसांसाठी रस्ता बंद होता.

सन २०१५-१६ च्या पावसाळ्यात कि.मी. ११/०० ते ११/३०० या लांबीमध्ये दरड घसरण झाल्याने एक दिवस एकेरी वाहतूक चालू होती.

सध्या रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ५७ दुधसंघ महानंद डेअरीला दूध पुरवठा करीत नसल्याबाबत

**(४५) ६४६३३ (१२-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २५ जिल्हा दूध संघ आणि ६० तालुका दूध संघ महानंद डेअरीचे सभासद असून या दूध संघांनी महानंदला दूध पुरविणे बंधनकारक असताना या दूध संघापैकी ५७ दूध संघ हे महानंद डेअरीला दूध पुरवठा करित नसून खासगी डेअरींना दूध पुरवठा करीत असल्याचे दिनांक १५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानंदच्या दुधाला मागणी असून दूधाचा पुरवठा कमी असल्याने इतर दूध संघांकडून महागडे दूध खरेदी करावे लागत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर दूध संघाचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१८-१०-२०१६) :**(१) होय. अशा प्रकारची बातमी दैनिक सामना या वर्तमान पत्रात दि. १६ जून, २०१६ रोजी प्रकाशित झालेली आहे.
(२), (३), (४) व (५) हे खरे आहे.
सदस्य संघाकडून काही प्रसंगी विहीत वेळेत दुधाचा पुरवठा न झाल्याने महानंद दुधाचे वितरण उशीरापर्यंत करण्यात येऊन वितरकांची दुधाची मागणी पूर्ण करण्यात आली आहे. काही सदस्य संघाकडून महानंदला दुध पुरवठा न झाल्याने दुग्धशाळेची निर्माण झालेली दुधाची तुट भरून काढण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत गोवर्धन डेअरी, राहूरी यांच्याकडून माहे मे, २०१६ मध्ये २३०१ लिटर्स प्रतिदिन, शासकीय दूध योजना ५,०३६ लिटर्स प्र.दिन तसेच जून, २०१६ मध्ये मे,इग्लु डेअरी यांनी ८५९ लि.प्रतिदिन व मे.एस.व्ही.के. डेअरी यांनी प्रतिदिन १२४८ लिटर नागपूर युनिटकरीता दुध महासंघाच्या त्या त्या वेळच्या प्रचलित दराने गाय दुधाची खरेदी करण्यात आलेली आहे. या कालावधीत करण्यात आलेल्या खाजगी दुध खरेदी प्रचलित दराने करण्यात आलेली असल्याने जादा दर अदा करण्यात आलेला नाही.

---

## मौजे विहीगांव (ता.खामगांव, जि.बुलढाणा) या गावातील भुसंपादन केलेल्या शेतजमीनीचा मोबदला देण्याबाबत

**(४६) ६४७१२ (१९-०८-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे विहीगांव ता.खामगांव येथील जमीन भुसंपादन प्रकरण क्र ७/१९७९-८०, २३/१९८०-८१, २९/१९७७-७८ आणि ३०/१९८०-८१ नुसार उपरोक्त गावातील शेतजमीन अधिग्रहीत करण्यात आली असल्याने सदरच्या जमीनीचा मोबदला कमी मिळाल्यामुळे न्यायालयात दाद मागीतली असता उच्च न्यायालयाने याप्रकरणी दिनांक २४ जानेवारी, २००६ रोजी शेतकऱ्याची अपील मंजूर करीत वाढीव मोबदला देण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी तत्कालीन भुसंपादन अधिकारी मध्यम प्रकल्प श्री बिराडे यांनी सन २०१२-१३ मध्ये बील तयार करुन शासनाकडे रक्कमेचे मागणी केली परंतु अद्यापपर्यंत उपरोक्त शेतकऱ्यांना मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक २४.१.२००६ चे आदेशाच्या अनुषंगाने संबंधित १९ भुधारकांना १,०४,०७,१५६/- दिनांक ९.६.२००८ रोजी मोबदला वाटप करण्यात आलेला आहे.

(३), (४) व (५) १९ भुधारकांना मा.उच्च न्यायालयाचे दिनांक २४.१.२००६ चे आदेशान्वये दिनांक ९.६.२००८ रोजी मोबदला वाटप करण्यात आलेला असल्यामुळे चौकशी व कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील साईबाबा नगर (प्लॉट नं. १७८)**
**येथे मंजूर २२० के.व्ही. सबस्टेशन सुरु करण्याबाबत**

**(४७) ६४८३८ (१८-०८-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील साईबाबा नगर (प्लॉट नं. १७८) येथे मंजूर २२० के.व्ही. सबस्टेशन सुरु करण्याकरिता ऑर्डीनस फॅक्टरी मधून जाणारी ट्रान्समिशन लाईन बाबत असलेली ऑर्डीनस फॅक्टरीच्या हरकतीची समस्या सोडवून सदर सबस्टेशन लवकर सुरु करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०५ डिसेंबर, २०१५ रोजी झालेल्या मा.उर्जामंत्री महोदयांच्या ठाणे व पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यामध्ये दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त पत्राची प्रत कार्यकारी अभियंता, इ. एन.व्ही. डिव्हिजन, कल्याण यांना सुद्धा दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने २२० के.व्ही. सबस्टेशन सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-१०-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय.
(४) उल्हासनगर उपकेंद्रासाठी २२० के.व्ही. पडघे-अंबरनाथ-II (जांभूळ) वाहिनीवर लिलो पध्दतीने वाहिनी उभारणे प्रस्तावित आहे. सदर वाहिनीसाठी अंबरनाथ शस्त्रागार कारखाना परिसरातून जाणारा एकच मार्ग उपलब्ध असल्याने सदर वाहिनी शस्त्रागार कारखाना परिसरातून उभारणे क्रमप्राप्त आहे. सदर वाहिनी उभारणीसाठी शस्त्रागार कारखान्याच्या प्रशासनाकडून परवानगी प्रतिक्षाधीन आहे. सदर परवानगी प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त वाहिनीची उभारणी शक्य होईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथे १३२ के.व्ही.पुरनाड (कर्की) हे उपकेंद्र आणि घोडस गाव येथे नवीन २२० केव्ही उपकेंद्र सुरु करण्याबाबत

**(४८) ६४८५१ (१८-०८-२०१६). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथे १३२ के.व्ही. पुरनाड (कर्की) हे उपकेंद्र आणि घोडस गाव येथे नवीन २२० केव्ही उपकेंद्राचा प्रस्ताव मंजूरीसाठी महापारेषणकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) कर्की (पुरनाड), ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव येथे महापारेषण कंपनीतर्फे उपसा जल सिंचन योजनेअंर्तत १३२ के.व्ही. मानपूर व कुऱ्हा वढोदा उपकेंद्रे प्रस्तावित असून सद्यस्थितीत त्यांची कामे प्रगतीपथावर आहे. त्यामुळे कर्की येथे वेगळ्या अतिउच्चदाब केंद्राची आवश्यकता नाही.

तसेच मलकापूर, जि.बुलढाणा येथे २२० के.व्ही. उपकेंद्र मंजूर झाले असून मलकापूर ते घोडसगाव हे अंतर अंदाजे फक्त १२ कि.मी. आहे. शिवाय विरोदा, ता.यावल, जि.जळगाव येथेही २२० के.व्ही. उपकेंद्र मलकापूर व २२० के.व्ही. विरोदा उपकेंद्रावर जोडता येईल. त्यामुळे घोडसगाव येथे वेगळ्या अति उच्च दाब उपकेंद्राची सद्यस्थितीत आवश्यकता नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई येथील टोल नाक्यावरील गाड्यांना करावी लागणारी प्रतिक्षा

**(४९) ६५०१५ (२६-१०-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत प्रवेश असलेल्या पाच टोल नाक्यांवर टोल भरण्यासाठी प्रतिक्षेत असलेल्या गाड्यांमुळे तब्बल ६ हजार २६० कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू माहिती खुद्द रस्ते विकास महामंडळाने केलेल्या एका सर्वेक्षणातून समोर आली असून मुंबईतील राहणीमान, वाहनांना प्रतिक्षेमध्ये होणारा उशीर, वाहनांच्या किंमती व दर्जा बघता हे नुकसान होत असल्याचे अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नुकसान रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०१-२०१७) :**(१) व (२) नाही.

मुंबईतील पाच प्रवेश नाक्यांवर असा केणताही अभ्यास करण्यात आलेला नाही.

(३) पथकर नाक्यावर कमीत कमी वेळ लागावा याकरता उपलब्ध जागेत सध्या स्टॅगरिंग पध्दतीने काही अतिरिक्त मार्गिका बनविण्यात आल्या आहेत. तसेच या ठिकाणी वेळ कमी लागावा या दृष्टीने ईटीसी मार्गिका बनवून इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पथकर गोळा करण्याची प्रणाली पथकर नाक्यांवर सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात रुग्णाकरिता वापरण्यात येणारी साधानसामुग्री नादुरुस्त असल्याबाबत

**(५०) ६५१९२ (१६-१२-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात रुग्णाकरिता वापरण्यात येणारे जुने स्ट्रेचर, व्हिलचेअर इत्यादी वैद्यकीय साहित्य नादुरुस्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत रुग्णांच्या नातेवाईकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाकडे, रुग्णालय प्रशासनाकडे गत दोन वर्षापासून तक्रारी करुनसुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कार्यवाही न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.